# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३६७-२२** **दिनांक ०१/१२/२०२२**

## वसई-विरार शहर मनपाचे कचरा संकलित करणारे ट्रक चोरी करुन ते स्क्रॅपमध्ये विकणा-या सराईत गुन्हेगारांना अटक- गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांची कारवाई

वसई-विरार शहर महानगरपालीकेचे कचरा संकलित करणारे ट्रक चोरीस जाण्याच्या घटनांच्या अनुषंगाने गुन्हे शख्रा कक्ष -२ यांनी वेगवेगळी पथके तयार करुन ट्रक चोरी झालेल्या गुन्हयांच्या घटनास्थळांना भेटी देवून प्राप्त माहीती व तांत्रीक पुराव्याच्या आधारे आरोपीत ईसम नामे १) वैजनाथ लांडगे वय ६५ वर्ष रा. साईबाबा नगर, परभणी २) जहीर शेख वय ४० वर्ष रा. फुलबाग, कॉलनी, परभणी ३) मुजीब शेख वय ४० रा. तलाब कट्टा, मानवत जिल्हा- परभणी यांना परभणी येथून ताब्यात घेवून त्यांचेकडे केलेल्या चौकशीत नमुद आरोपीत हे ट्रक चोरीचे खालील गुन्हयात सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहेत.

| अक्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि व कलम |
|---|---|---|
| १. | वसई | २९१/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| २. | वसई | ३४६/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | आचोळे | ४७३/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | आचोळे | ५०६/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

नमुद आरोपीतांनी चोरलेले ४ डंपर पैकी १ डंपर आणि ईतर ३ डंपर तोडून त्याचे पार्ट वेगळे काढुन ते स्क्रॅपमध्ये विक्री केले असल्याने तपास पथकाकरवी चोरलेल्या ३ डंपरचे ईंजिन, क्लचपेट, गिअर बॉक्स आणि डिस्कसह टायर असा एकुण ५,४०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत नं १ वैजनाथ लांडगे याचे विरोधात नवी मुंबई आणि परभणी येथे चोरीचे ४ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनिटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहा.पो.फौज/९५०१३ रमेश भोसले, सहाफौज/९५०२१ मंगेश चव्हाण, सहाफौज/९६०३६ संजय किसन नवले, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पो हवा/१२०४७ दादा आडके, पो हवा/१२०५३ सुधीर नरळे, पोना/०३०३२ प्रशांतुकमार ओमप्रकाश ठाकुर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, सायबर शाखेचे सहाफौज/ संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

----------ooo------------

